Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 22/09/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## आगळे वेगळे विनोदी लेखक दत्तू बांदेकर



दत्तात्रेय तुकाराम म्हणजे दत्तू बांदेकर हे कानडी भाषेत जेमेतेम सात 'बुकं' शिकून मराठी भाषेवर प्रभुत्व मिळविणारे एक आगळ्या प्रतिभेचे आणि वेगळ्याच प्रकृतीचे मराठी लेखक होते. त्यांचा जन्म २२ सप्टेंबर १९०९ रोजी कारवार कर्नाटक येथे झाला. काही काळ पुण्यात घालवल्यावर पुढे मुंबईत स्थायिक झाले. त्यांचे सारे जीवन कष्टात गेले, पण त्यांच्या स्वभावात त्याचा कडवटपणा कधी उतरलेला कुणी पाहिला नाही. मोठमोठ्या विद्वानांपासून ते अगदी गावंढळापर्यंत सगळ्यांनाच त्यांच्या लिखाणाने लोभविले. आचार्य अत्र्यांचे ते उजवे हात होते. १९३४ साली आचार्य अत्रे, दत्तू बांदेकर, सुंदर मानकर आणि कॅप्टन मा.कृ.शिंदे यांनी 'साहित्य झब्बूशाही विध्वंसक मंडळ' नावाचे साहित्यावर चर्चा करणारे मंडळ काढले होते. मंडळाची पहिली सभा विभावरी शिरूरकर यांच्या वाङ्मयावर मुंबईच्या रॉयल ऑपेरा हाऊसमध्ये झाली होती. तेव्हापासून अत्रे आणि बांदेकरांची मैत्री सुरू झाली.

जुलै १९४० पासून बांदेकर आचार्य अत्र्यांच्या साप्ताहिक नवयुगमध्ये 'रविवारचा मोरावळा' नावाचे सदर लिहीत. चित्रपट विषयाला वाहिलेल्या 'चित्रा' साप्ताहिकात ते प्रूफरीडर म्हणून कामाला लागले. पुढे 'चित्रा'तून त्यांनी 'तो आणि ती', 'आजकालचे गुन्हेगार', 'सख्याहरी ' ही सदरे लिहिली. त्यातील 'सख्याहरीला' त्याच्या 'प्रेयसीने लिहिलेली पत्रे' हे स्वरूप होते. त्यातून सामान्य माणसांचे दैनंदिन जीवन, त्यांच्या भानगडी यासंबंधी चुटपुटीत भाष्य असे. टवाळकीच्या ढंगात लिहिलेले सदर जितके लोकप्रिय झाले तितकेच टीकेचेही धनी झाले. पुढे अत्र्यांच्या 'नवयुग' मध्ये ते दाखल झाले आणि अखेरपर्यंत तेथेच राहिले. अत्र्यांच्या नवयुगमधून बांदेकरांनी लिहिलेली 'अक्काबाईचा कोंबडा', 'जग ही रंगभूमी', 'घारुअण्णांची चंची' ही सदरे लोकप्रिय झाली. ४ ऑक्टोबर १९५९ रोजी मुंबई येथे दत्तू बांदेकर यांचे निधन झाले.

Nashik Edition
Sep 22, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401